3 1 DEC 2018

तरुण भारत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर







कोल्हापूर : 'तरुण भारत'च्या २६ व्या वर्धापनदिनास उपस्थित बेळगाव मुख्य प्रतिनिधी उपेंद्र बाजीकर सीएमओ उदय खाडिलकर, प्रॉडक्शन मॅनेजर धैर्यशील पाटील, सीईओ दीपक प्रभू, सीएफओ वीरसिंग भोसले, आयटी मॅनेजर जयंत चव्हाण. शुभेच्छा देताना जिल्हा पोलीस प्रमुख डॉ. अभिनव देशमुख. प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, संपादक जयवंत मंत्री, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, निवासी संपादक मनोज साळुंखे.



# राष्ट्र विकासात वैज्ञानिक संशोधन मोलाचे

## डॉ. ए. एम. गुरव : आविष्कार महोत्सवाचे बक्षीस वितरण

**पेठवडगाव / प्रतिनिधी :**
राष्ट्राच्या विकासात वैज्ञानिक संशोधन मोलाचे असून वैज्ञानिक दृष्टिकोनाशिवाय भारत महासत्ता होणार नाही, असे प्रतिपादन शिवाजी विद्यापीठ आविष्कार संशोधन महोत्सवाचे अध्यक्ष डॉ. ए. एम. गुरव यांनी केले. ते येथील विजयसिंह यादव कला व विज्ञान महाविद्यालयात आयोजित केलेल्या जिल्हास्तरीय आविष्कार महोत्सवात बोलत होते. अध्यक्षस्थानी प्राचार्य डॉ. विजया चव्हाण या होत्या. माजी नगरसेवक राजकुमार पोळ हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते.

डॉ. गुरव पुढे म्हणाले की, संशोधनाशिवाय येथून पुढे पर्याय नाही. संशोधन वृत्ती अधिकाधिक वाढीस लागावी व संशोधन अधिकाधिक लोकाभिमुख व्हावे यासाठी शिवाजी विद्यापीठ शासन स्तरावर पाठपुरावा करत आहे.

परीक्षक म्हणून डॉ. एस. व्ही. पोरे, डॉ. के. एन. निकम, डॉ. टी. एम. वांडरे, डॉ. अनामिका कदम यांनी तसेच ऐश्वर्या दाडमोडे, अनिता गुरव या विद्यार्थ्यांनी मनोगत व्यक्त केले. प्रास्ताविक समन्वयक डॉ. चंद्रकांत माने यांनी, तर निकाल वाचन प्रा. अशोक चव्हाण यांनी केले. डॉ. प्रशांत यादव यांनी आभार मानले. महोत्सवात सुमारे २७६ संशोधक विद्यार्थ्यांनी उत्स्फूर्त सहभाग घेतला.

निकाल पुढीलप्रमाणेः ह्युमॅनिटीज, लँग्वेज, फाईन आर्ट विभाग : विद्याश्री




**पेठवडगाव : येथील विजयसिंह यादव कॉलेजमध्ये आविष्कार महोत्सवातील विजेत्या स्पर्धकांना बक्षीस वितरणप्रसंगी डॉ. ए. एम. गुरव, प्राचार्य डॉ. विजया चव्हाण, राजकुमार पोळ व इतर.**

पुरोहित (प्रथम- कॉमर्स कॉलेज कोल्हापूर), शीतल संजय संकपाळ (द्वितीय- शहाजी कॉलेज, कोल्हापूर), ऋषीकेश पचागणे (तृतीय क्रमांक विभागून : महावीर कॉलेज, कोल्हापूर), शिवानी अरुण धोंगडे, (वारणा महाविद्यालय). कॉमर्स मॅनेजमेंट, लॉ या विभागात प्रियांका एन. पुरोहित (प्रथम- विवेकानंद कॉलेज), पुष्कर सराफ (द्वितीय- डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर) पूजा मनोज पाटील (तृतीय- व्यंकटेश महाविद्यालय, इचलकरंजी) प्युअर सायन्स विभाग : यश आंबोळे (प्रथम- न्यू कॉलेज, कोल्हापूर), प्राची चव्हाण (द्वितीय- डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर) राधिका पाटील (विभागून तृतीय कॉलेज ऑफ फार्मसी कोल्हापूर), रुची नितीन जगड (स्कूल ऑफ नॅनो सायन्स अँड टेक्नॉलॉजी, कोल्हापूर)

ॲग्रिकल्चर अँड ॲनिमल हजबंडरी विभाग : सोनाली तानाजी पवार (विजयसिंह यादव महाविद्यालय पेठवडगाव- प्रथम), साक्षी कैलास देवळेकर टेक्नॉलॉजी विभाग, शिवाजी विद्यापीठ) श्रद्धा संतोष पाटील (शिवराज महाविद्यालय, गडहिंग्लज- तृतीय), इंजिनिअरिंग अँड टेक्नॉलॉजी विभाग : अनुजा सुनील बेलेकर (डीकेएएससी कॉलेज, इचलकरंजी- प्रथम), शुभम जे. पाटील (डॉ. डी. वाय. पाटील कॉलेज, कोल्हापूर-द्वितीय), रूपाली खैरे (जयसिंगपूर महाविद्यालय), श्वेता कदम, (टीकेआयईटी कॉलेज, वारणानगर विभागून तृतीय), मेडिसीन अँड फार्मसी विभाग : सुमित टिळे (टीकेआयईटी कॉलेज, वारणानगर- प्रथम) अर्चना जाधव (कोरे कॉलेज ऑफ फार्मसी, वारणानगर- द्वितीय), नेहा एन. पाटील (कॉलेज ऑफ फार्मसी, कोल्हापूर- तृतीय). विजेत्यांना मान्यवरांच्या हस्ते बक्षीस वितरण करण्यात आले.

सकाळ

# दिव्यांग विद्यार्थ्यांमध्ये कार्यक्षमता अधिक : शिंदे

**कोल्हापूर, ता. ३० :** दिव्यांग विद्यार्थ्यांत सर्वसाधारण व्यक्तींपेक्षाही अधिक कार्यक्षमता असते. त्यांनी या क्षमतेच्या बळावर आपल्या देशाचे नाव उज्ज्वल होईल, अशी कामगिरी बजावावी, असे आवाहन शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी नुकतेच येथे केले. शिवाजी विद्यापीठाच्या बॅरिस्टर बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व मूक-कर्णबधीर असोसिएशनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित तीन दिवसीय मूक-कर्णबधीर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. लोककला केंद्रात हा कार्यक्रम झाला.

Kolhapur, Kolhapur-Today
31/12/2018 Page No. 5

# भोसले यांच्या संशोधन प्रकल्पास प्रथम क्रमांक

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठात झालेल्या विद्यापीठस्तरीय संशोधन महोत्सव 'आविष्कार २०१८'मध्ये इचलकरंजीतील डीकेएएससी कॉलेजच्या प्रा. सुनील भोसले यांच्या 'कोल्हापूर जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेचे मूल्यांकन' या संशोधन प्रकल्पास प्राध्यापक गटामध्ये प्रथम क्रमांक मिळाला.

या संशोधन प्रकल्पाची गडचिरोलीतील गोंडवन विद्यापीठात होणाऱ्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली. संशोधनामध्ये जलयुक्त शिवार योजनेंतर्गत ओढ्यांवर बांधण्यात आलेले सिमेंट बंधारे गाळमुक्त कसे करता येतील?, ग्रामीण भागाच्या शाश्वत विकासासाठी योजना प्रभावीपणे कशी अंमलात आणता येईल याबाबत उपाययोजना सुचविण्यात आल्या. प्रा. भोसले यांच्या संशोधन प्रकल्पांची सलग तीन वर्षे राज्यस्तरीय स्पर्धेसाठी निवड झाली आहे. त्यांनी २०१६मध्ये कोल्हापूर शहर हद्दवाढ, २०१७मध्ये पाणलोट क्षेत्र व्यवस्थापन व २०१८मध्ये जलयुक्त शिवार अशा समाजोपयोगी विषयांवर संशोधन केले आहे. यासाठी त्यांना विवेकानंद शिक्षणसंस्थेच्या सचिवा प्राचार्य शुभांगी गावडे, अध्यक्ष अभयकुमार साळुंखे, प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, डॉ. डी. सी. कांबळे यांचे मार्गदर्शन लाभले.



आविष्कार संशोधन महोत्सवात प्रथम क्रमांकाचे पारितोषिक स्वीकारताना प्रा. सुनील भोसले.

लोकमत


# जलतरणमध्ये कोल्हापूरचे वर्चस्व

## अकराव्या मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धा

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व मूक-कर्णबधिर असोसिएशन, कोल्हापूर यांच्यावतीने आयोजित अकराव्या मूक-कर्णबधिर राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत रविवारी झालेल्या जलतरण स्पर्धेत कोल्हापूर जिल्ह्याने वर्चस्व राखले.

स्पर्धेत राज्यभरातील ३१५ खेळाडू सहभागी झाले आहेत. थाळीफेक, गोळाफेक, कुस्ती, फुटबॉल, जलतरण अशा विविध १८ प्रकारांमध्ये स्पर्धा होत आहे. सागर पाटील जलतरण तलाव येथे झालेल्या स्पर्धेचा निकाल असा : **जलतरण : फ्री स्टाईल : ५० मीटर :** आदेश रुकडीकर (कोल्हापूर), अनिरुद्ध खांटे (नागपूर), श्रेयश पारकर (मुंबई). **१०० मीटर :** अनिरुद्ध खांटे (नागपूर), आदेश रुकडीकर (कोल्हापूर), सौमित्र गोरे (पुणे). **४०० मीटर :** आदेश रुकडीकर (कोल्हापूर), सौमित्र गोरे (पुणे). **८०० मीटर :**



सौमित्र गोरे (पुणे), आदेश रुकडीकर (कोल्हापूर). **१५०० मीटर :** आदेश रुकडीकर (कोल्हापूर), सौमित्र गोरे (पुणे).

**बॅक स्ट्रोक : ५० मीटर :** अनिरुद्ध खांटे (नागपूर), श्रेयश पारकर (मुंबई), प्रणव लोहाले (नांदेड), **१०० मीटर :** अनिरुद्ध खांटे (नागपूर), श्रेयश पारकर (मुंबई), ताहीर मुल्लाणी (कोल्हापूर). **२०० मीटर :** अनिरुद्ध खांटे (नागपूर).

**ब्रिस्ट स्ट्रोक : ५० मीटर :** अमेय गायल (पुणे), श्रेयश पारकर (मुंबई), प्रणव लोहाले (नांदेड). **१०० मीटर :** अमेय गायल (पुणे), श्रेयश पारकर (मुंबई), प्रणव लोहाले (नांदेड). **२०० मीटर ब्रिस्ट स्ट्रोक :** अमेय गायल (पुणे), प्रणव लोहाले (नांदेड), **५० मीटर बटरफ्लाय :** सागर बडवे (जालना), श्रेयस पारकर (मुंबई),अभिषेक रुकडीकर (कोल्हापूर). **१०० मीटर बटरफ्लाय :** सागर बडवे (जालना), अभिषेक रुकडीकर (कोल्हापूर). **२०० मीटर बटरफ्लाय :** सागर बडवे (जालना), अभिषेक रुकडीकर (कोल्हापूर).

**२०० मीटर आयएम :** सागर बडवे (जालना), ताहीर मुल्लाणी (कोल्हापूर), अमेय गायल (पुणे). **४०० मीटर आयएम :** ताहीर मुल्लाणी (कोल्हापूर), अभिषेक रुकडीकर (कोल्हापूर).

**मुली : २००मीटर :** सुब्रिया मुल्लाणी (कोल्हापूर), शिवानी गुरव (सांगली). **४०० मीटर फ्री स्टाईल मुली :** सुबिया मुल्लाणी (कोल्हापूर). **२०० मीटर आयएम मुली :** सुब्रिया मुल्लाणी (कोल्हापूर). **१०० मीटर. बॅक स्ट्रोक :** सुब्रिया मुल्लाणी (कोल्हापूर). **५० मीटर बटरफ्लाय :** सुबिया मुल्लाणी (कोल्हापूर).

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
31 DEC 2018
लोकसत्ता

# शिवाजी विद्यापीठाच्या संगीत, नाट्यशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी डॉ. अंजली निगवेकर

प्रतिनिधी, कोल्हापूर

**शिवाजी विद्यापीठाच्या** संगीत व नाट्यशास्त्र अधिविभागाच्या प्रमुखपदी डॉ. अंजली निगवेकर यांची नियुक्ती करण्यात आली. डॉ. निगवेकर या दृष्टी दिव्यांग असूनही त्यांनी संगीत विशेषतः गायन अध्यापनात स्वतःचा ठसा उमटविला आहे. आपल्या दिव्यांगत्वाची कोणतीही सबब पुढे न करता गेली सुमारे २८ वर्षे डॉ. निगवेकर विद्यापीठात अध्यापन कार्य करीत आहेत.

त्यांच्या नियुक्तीनंतर त्यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांची सदिच्छा भेट घेऊन ग्रंथ देऊन अभिनंदन केले. विविध गायन कलाप्रकारांत निष्णात असलेल्या निगवेकर यांच्या अनुभवाचा लाभ संगीतशास्त्र अधिविभागाला होईल. प्रशासनाचे त्यांना सर्वतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही शिंदे यांनी दिली. अधिविभाग प्रमुखपदाची जबाबदारीही त्या समर्थपणे सांभाळतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

डॉ. निगवेकर या १९८६ मध्ये संगीतशास्त्र अधिविभागात विद्यार्थिनी म्हणून प्रवेशित झालेल्या होत्या. त्यानंतर डॉ. भारती वैशंपायन यांच्या मार्गदर्शनाखाली संगीतशास्त्र विषयात पीएच.डी. केली आहे. विद्यार्थिनी ते अधिविभागप्रमुख असा त्यांचा येथील प्रवास आहे.

लोकमत

दीपक जाधव



**अनंत आमची ध्येयासक्ती..! :** कोल्हापुरातील शिवाजी विद्यापीठाच्या मैदानावर सुरु असलेल्या मूक-कर्णबधिरांच्या राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेत दिव्यांगाने लांबउडीमध्ये अशी झेप घेतली. 'अनंत आमची ध्येयासक्ती, अनंत आमची आशा' या उक्तीप्रमाणे जगण्यातील जिद्द त्याने खेळातही दाखवून दिली.

## संक्षिप्त



कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या बॅ. बाळासाहेब खर्डेकर ज्ञानस्त्रोत केंद्राचे समावेशी शिक्षण संसाधन केंद्र, विद्यापीठाचा क्रीडा अधिविभाग व कोल्हापूर मूक-कर्णबधिर असोसिएशन यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित राज्यस्तरीय क्रीडा स्पर्धेच्या दुसऱ्या दिवशी ॲथलेटिक्स स्पर्धा झाल्या. धावणे, लांब व उंच उडी, थाळी-गोळा-भाला फेक अशा स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. (छाया : तय्यब अली)

# विठ्ठल रामजी शिंदे अध्यासनातर्फे चर्चासत्र

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठाच्या महर्षी विठ्ठल रामजी शिंदे अध्यासन व एन. डी. पाटील प्रतिष्ठान, कोल्हापूर यांच्या संयुक्त विद्यमाने 'भारतीय अस्पृश्यतेचा प्रश्न- संशोधन आणि कार्य' या विषयावर बुधवारी (दि. २ जानेवारी) चर्चासत्र होणार आहे. विद्यापीठाच्या भौतिकशास्त्र अधिविभाग सभागृहामध्ये सकाळी साडेदहा वाजता ज्येष्ठ विचारवंत डॉ. एन. डी. पाटील यांच्या हस्ते चर्चासत्राचे उद्‍घाटन होईल. ज्येष्ठ विचारवंत डॉ. गोपाळ गुरु यांचे बीजभाषण होईल. मानव्यविद्या शाखेच्या अधिष्ठाता डॉ. भारती पाटील या अध्यक्षस्थानी असतील. या चर्चासत्रात डॉ. दिलीप चव्हाण, भारत पाटणकर, टी. एस. पाटील, नागनाथ कोत्तापल्ले, अशोक चौसाळकर मार्गदर्शन करणार आहेत, अशी माहिती मराठी अधिविभाग प्रमुख डॉ. राजन गवस आणि चर्चासत्राचे समन्वयक डॉ. रणधीर शिंदे यांनी दिली.

पुढारी

# अंजली निगवेकर विद्यापीठाच्या पहिल्या दिव्यांग विभागप्रमुख

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

गायन कलाप्रकारांत निष्णात असलेल्या डॉ. अंजली निगवेकर यांच्या अनुभवाचा लाभ संगीतशास्त्र अधिविभागाला निश्चितपणे होईल. विद्यापीठ प्रशासनाचे त्यांना सर्वोतोपरी सहकार्य राहील, अशी ग्वाही कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांनी दिली.

संगीत व नाट्यशास्त्र अधिविभाग प्रमुखपदी डॉ. निगवेकर यांची नियुक्ती करण्यात आली. त्या दृष्टी दिव्यांग असूनही त्यांनी संगीत व विशेषत: गायन अध्यापनात स्वत:चा ठसा उमटविला आहे. त्यांच्या नियुक्तीनंतर कुलगुरू डॉ. शिंदे यांनी त्यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन केले. यावेळी प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. विलास नांदवडेकर, शैक्षणिक सल्लागार डॉ. डी. आर. मोरे, संगीतशास्त्र अधिविभागातील शिक्षक निखील भगत, डॉ. विनोद ठाकूर-देसाई, सुप्रिया टिपुगडे आदी उपस्थित होते.



**कोल्हापूर : डॉ. अंजली निगवेकर यांचे ग्रंथभेट देऊन अभिनंदन करताना कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे.**

डॉ. निगवेकर १९८६ मध्ये संगीतशास्त्र अधिविभागात विद्यार्थिनी म्हणून प्रवेशित झालेल्या होत्या. त्यानंतर डॉ. भारती वैशंपायन यांच्या मार्गदर्शनाखाली संगीतशास्त्र विषयात त्यांनी पीएच.डी. केली असून, १९९१ पासून २८ वर्षे अध्यापनाचे कार्य करीत आहेत.